वाचले:-महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग पत्र क्र. संकीर्ण-२०२६/सं.क्र.१५६८/नवि-२२, दि. ३०/१०/२०२६

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११०१८,
सामान्य प्रशासन विभाग
साप्रवि/२/कावि/३६५/२०२६,
दि.२० /११/२०२६

विषय: महाराष्ट्र विधीमंडळाचे सन २०२६ च्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशन कालावधीतील कामकाजाकरिता समन्वय अधिकारी तसेच सहाय्यक समन्वय अधिकारी नियुक्ती करणेबाबत.

आदेश,

महाराष्ट्र विधीमंडळाचे सन २०२६ चे हिवाळी अधिवेशन नागपूर येथे दि. ०७ डिसेंबर २०२६ पासून सुरु होत आहे. विधीमंडळ अधिवेशनात तारांकित प्रश्न, लक्षवेधी सूचना, स्थगन प्रस्ताय व इतर कामकाज विधानमंडळ सचिवालयाकडून महापालिकेस प्राप्त होत असते, त्यानुसार विधीमंडळ कामकाज प्राधान्याने व विहित कालावधीत पार पाडणे आवश्यक आहे. सन २०२६ चे नागपुर येथील हिवाळी अधिवेशन कामकाजाकरीता पिंपरी चिंचवड महानगरपालिके मधील खालीलप्रमाणे अधिका-यांची 'समन्वय अधिकारी' व 'सहाय्यक समन्वय अधिकारी' म्हणून नियुक्ती करणेस मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	समन्वय अधिका-याचे नावं, पदनाम, विभाग, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल	सहाय्यक समन्वय अधिका-याचे नावं, पदनाम, विभाग, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल	शेरा
१	श्री. आगळे राजेश अंकुश उप आयुक्त् (आकाशचिन्ह व परवाना) भ्रमणध्वनी- ७७२२०६०९१० ई-मेल r.aagle@pcmcindia.gov.in	श्री. येळे अजिंक्य भालचंद्र, सहा. आयुक्त (सामान्य प्रशासन) भ्रमणध्वनी- ९९२३१२६६२६ ई-मेलa.yele@pcmcindia.gov.in prashasan@pcmcindia.gov.in	प्रशासकीय विषयक कामकाज
२	श्री. सेठिया मनोज मोतीलाल, शहर अभियंता, (एकात्म विभाग) भ्रमणध्वनी- ९९२२५०१७३६ ई मेल m.sethiya@pcmcindia.gov.in	श्री. सुर्यकांत शिवाजीराव मोहिते, कार्यकारी अभियंता (स्या) (बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग)भ्रमणध्वनी- ९९२२५०२८२८ ई-मेल-s.mohite@pcmcindia.gov.in bldp@pcmcindia.gov.in	अभियांत्रिकी विषयक कामकाज

उपरोक्त नियुक्त करण्यात आलेल्या 'समन्वय अधिकारी' यांना विधीमंडळ कामकाजाबाबत खालील कार्यपध्दतीचा अवलंब करण्याबाबत निर्देश देण्यात येत आहेत.

१. विधानमंडळ आयुधांशी संदर्भात शासनाशी पत्र व्यवहार करताना आयुक्त अथवा अतिरिक्त आयुक्त यांच्या स्वाक्षरीने करावेत.
२. प्रश्नाचे उत्तर, निवेदन व पूरक टिप्पणी, स्वयंस्पष्ट अहवाल अचूक व मुद्देसूद असल्याची खात्री करुन आयुक अथवा अतिरिक्त आयुक्त यांच्या मान्यतेने विहित कालमयदित शासनास पाठविणे आवश्यक आहे. (त्याचप्रमाणे सदर माहितीची सॉफ्ट कॉपी ई-मेल द्वारे पाठविणे आवश्यक आहे.)
३. विधीमंडळ कामकाजाच्या अनुषंगाने ज्या दिवशी मा. उपमुख्यमंत्री (नगरविकास विभाग) महोदय व मा. राज्यमंत्री यांनी पूर्व चर्चेसाठी उपस्थित राहण्यासाठी निर्देश दिले असतील, त्या दिवशी आयुक्त यांनी उपस्थित राहणे आवश्यक आहे.
४. विधानमंडळ कामकाजाच्या दिवशी संबंधित अधिका-यांना विधानमंडळ कामकाजाकरिता हिवाळी अधिवेशन कार्यकालावधीमध्ये वाहनांची व्यवस्था करण्याकामी कार्यव्यवस्थापन, कार्यशाळा विभाग यांनी कार्यवाही करावी.

५. विधानमंडळाच्या कामकाजात ज्या दिवशी नियम २९३ व २६० अन्वये चर्चा अथवा अंतिम आठवड्याच्या चर्चेच्या दरम्यान महानगरपालिकेशी संबंधित मुद्दे उपस्थित होण्याची शक्यता असते त्यावेळी, सदर मुद्याबाबतची माहिती उपलब्ध करुन देणे व इतर अनुषंगिक माहिती उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही संबंधित समन्वय अधिका-यांनी पार पाडवी.

६. विधानमंडळ कामकाज उशिरापर्यंत सुरू असल्याने विधानमंडळाच्या पुढील दैनंदिन कामकाजाची कार्यक्रम पत्रिका (order of day) विभागास रात्री उशिरा प्राप्त होत असते. सदर कार्यक्रम पत्रिकेमध्ये महानगरपालिकेशी सबंधित मुद्दे उपस्थित झाले असल्यास त्याबाबतची कार्यवाही करण्याकरिता महानगरपालिकेच्या सबंधित अधिका-यांना दुरध्वनीद्वारे तात्काळ संपर्क करणे आवश्यक आहे. यास्तव, महापालिकेच्या अधिनस्त सर्व विभागप्रमुखांना अधिवेशन कालावधीत दूरध्वनीद्वारे/गरज भासल्यास व्यक्तिशः उपलब्ध राहण्याच्या सूचना 'समन्वय अधिकारी' यांनी द्याव्यात.

विधानमंडळ कामकाज पार पाडण्याच्या अनुषंगाने संबंधित 'समन्वय अधिकारी' यांनी हिवाळी अधिवेशन कालावधीमध्ये शासना मार्फत पारीत होणा-या सुचना तसेच सर्व निर्देशांचे पालन करावे. सन २०२६ चे आगामी हिवाळी अधिवेशन कालावधीमध्ये शासना मार्फत प्राप्त होणा-या सुचना तसेच सर्व निर्देशांचे पालन, नगर विकास विभागाच्या विधानमंडळाच्या कामकाजाशी संबंधित असलेले टपाल व तद्अनुषंगीक सर्व पत्रव्यवहार प्राधान्याने व तातडीने करावा. तसेच उपरोक्त अधिकारी यांनी यापूर्वी सोपविलेल्या मुळ विभागाचे कामकाज सांभाळून विषयांकीत कामकाज करावे.

(डॉ. विजय सूर्यवंशी)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

प्रती - १) सर्व संबंधित अधिकारी
प्रत - १) सर्व विभाग/विभागप्रमुख २) नगर विकास विभाग (नवि-२२), महाराष्ट्र शासन